6258

जा. क्रं. जिपऔ/शिक्षण/प्राथि-३/९९

कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद.

दिनांक:- ३.४.१९९९

प्रति,

अध्यक्ष व सचिव,

जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळ,

सिडको औरंगाबाद.

विषय:- शतकर्णी विमुक्त जन प्रबोधनी शिक्षण संस्था सिडको औरंगाबाद या संस्थेतर्गत ~~चालविलेल~~चालविली जाणारी शासन मान्य हास्तांतरीत राष्ट्रकुट प्रा.शा. सिडको एन-८ औरंगाबाद [ विनाअनुदानित] मराठी माध्यम ही शाळा जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळ सिडको या संस्थेस कायम स्वरुपी हस्तांतरीत करणे बाबत.

संदर्भ:-१] मा. शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक प्राथि-५/ १९९८-९९/१९/१२७०८/ दि. २२.३.९९

२] आपले पत्र क्रमांक निरंक दिनांक १५.१२.९८ अध्यक्ष जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्रमांक -२ नुसार आपण सादर केलेल्या प्रस्तावास मा. शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांनी संदर्भीय पत्र क्रं.-१ नुसार सतकरणी विमुक्त जन प्रबोधनी शिक्षण संस्था या संस्थेतंर्गत चालविली जाणारी शासन मान्य राष्ट्रकुट प्राथमिक शाळा सिडको एन-८ औरंगाबाद. [ विना अनुदानित] मराठी माध्यम ही आपल्या संस्थेस कायम स्वरुपी हस्तांतरास मान्यता देण्यात आली आहे. हस्तांतरा नंतर आपली संस्थेस खालील बाबीची अट घालण्यात येत आहे. त्याची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी आपल्या संस्थेची राहील याची आपण प्रामुख्याने नोंद घ्यावी.

या शाळेतील हस्तांतरापुर्वी कार्यरत असलेले शिक्षक वृंदासह व शाळेच्या संबधित संपुर्ण अभिलेखयासह हस्तांतर करुन घ्यावे. संस्थेने शासनाचे वेळोवेळी निघणारे आदेश व तसेच शाळा ज्या अटीवर मान्य करण्यात आली आहे त्या अटींची पुर्तता आणि पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील याची देखील नोंद घ्यावी.

स्थळप्रतीवर शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी असे.

शिक्षणाधिकारी[प्राथमिक]

जिल्हा परिषद औरंगाबादकरिता

प्रतिलीपी,

१] मा. शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२] अध्यक्ष / सचिव, सतकरणी विमुक्त जन प्रबोधनी शिक्षण संस्था सिडको एन-८ औरंगाबाद यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

शिक्षणाधिकारी[प्राथमिक]

जिल्हा परिषद औरंगाबाद.